क्र. १२६ पहिले वर्ष

२९ जानेवारी २०२३

# रविवारची उपासना

## सामान्यकाळातील चौथा रविवार

### प्रस्तावना

प्रभू येशू ख्रिस्त हा परमेश्वर आहे. म्हणून ख्रिस्ताने आपल्या शिकवणुकीद्वारे अनेक प्रकारचे चमत्कार करून अनेकांना प्रेमाने जवळ आणले व शांतीचा व ऐक्याचा संदेश दिला. आपल्याला जेव्हा अधिकार दिले जातात तेव्हा आपण त्यांचा कसा वापर करतो? स्वत:ला श्रेष्ठ समजून इतरांची कुचंबना करीत असतो का? असे न करता ख्रिस्ताचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून नेहमी बंधुभाव, समता, प्रेम व एकीची भावना आपणामध्ये निर्माण व्हावी म्हणून आजच्या मिस्साबलीत विशेष प्रार्थना करू या.

**आपण प्रार्थना करू या.**

हे प्रभो, आमच्या परमेश्वरा, तुझी अंत:करणापासून भक्ती करण्यासाठी व तू जसे आम्हांवर प्रेम करतोस तसे शेजाऱ्यांवर प्रेम करण्यासाठी आम्हांला साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

**प्रभू शब्दविधी**

### पहिले वाचन

**सफन्या या पुस्तकातून घेतलेले वाचन २:३;३:१२-१३**

**"मी तुझ्यामध्ये नम्र आणि गरीब लोक राहू देईन."**

देशातील सर्व नम्र जनांनो, परमेश्वराच्या न्यायानुसार चालणाऱ्यांनो त्याच आश्रय घ्या, धार्मिकता आणि नम्रता यांचे अवलंबन करा. म्हणजे परमेश्वराच्या क्रोधदिनी तुम्ही दृष्टीआड व्हाल. "मी तुझ्यामध्ये नम्र आणि गरीब लोक राहू देईन. ते परमेश्वराच्या नामावर श्रध्दा ठेवतील, इस्राएलचे अवशिष्ट जन काही अनिष्ट करणार नाहीत; लबाडी करणार नाहीत, त्यांच्या मुखात कपटी जिव्हा आढळावयाची नाही, कारण ते चरतील आणि विश्रांती मिळवतील, कोणी त्यांस भिववणार नाही."

**हा प्रभूचा शब्द आहे.**

**१४५:६ब-७,८अब,८क,९क,१०**

प्रतिसाद : **जे आत्म्याने दीन ते धन्य. कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे.**

१. तो सदा आपले सत्यवचन पाळतो,
छळलेल्यांचा न्यायनिवाडा करतो.
भुकेल्यांनाअन्न देतो.
परमेश्वर बंदिवानांस मोकळे करतो.

२. परमेश्वर आंधळ्यांना दृष्टी देतो, परमेश्वर वाकलेल्यांना ताठ करतो, परमेश्वर उपऱ्यांचे रक्षण करतो, अनाथ आणि विधवा ह्यांची दाद घेतो.

३. परमेश्वर नीतिमानांवर प्रेम करतो,
परंतु दुर्जनांचा मार्ग वेडावाकडा करतो.
परमेश्वर सर्वकाळ राज्य करतो, हे सियोन,
तुझा देव पिढ्यानुपिढ्या राज्य करतो.

### दुसरे वाचन

**पौलचे करिंथकरांस पहिले पत्र यातून घेतलेले वाचन १:२६-३१.**

**"जगातील जे कनिष्ठ ते देवाने निवडले."**

बंधुजनहो, तुम्हांस झालेले पाचारणच घ्या; तुमच्यामध्ये जगाच्या दृष्टीने ज्ञानी, समर्थ, कुलीन, असे पुष्कळजण नाहीत; तरी शहाण्यास लाजवावे म्हणून देवाने जगातील जे मूर्ख ते निवडले आणि जे बलवान ते लाजवावे म्हणून देवाने जगातील जे दुर्बळ ते निवडले आणि जगातील जे कनिष्ठ, जे धिक्कारलेले आणि जे शून्यवत् अशांना देवाने ह्याकरिता निवडले जे आहे ते त्याने रद्द करावे, म्हणजे देवासमोर कोणाही मनुष्याने अभिमान बाळगू नये. त्याच्याकडून तुम्ही ख्रिस्त येशूमध्ये आहा, तो देवापासून आपल्याला ज्ञान म्हणजे नीतिमत्व आणि पवित्रीकरण आणि खंडणी भरून प्राप्त केलेली मुक्ती असा झाला आहे; 'जो अभिमान बाळगतो, त्याने परमेश्वराविषयी तो बाळगावा' ह्या शास्त्रलेखाप्रमाणे व्हावे.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**योहान १:१२-२४**

**आलेलुया, आलेलुया!**

शब्द देही झाला आणि त्याने आम्हांमध्ये वस्ती केली, जितक्यांनी त्याचा स्वीकार केला तितक्यांना त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार दिला.

**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**मत्तय लिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन ५:१-१२**

**"जे आत्म्याने दीन ते धन्य."**

लोकसमुदायांना पाहून येशू डोंगरावर चढला आणि तो खाली बसल्यावर त्याचे शिष्य त्याच्याजवळ आले. मग तो तोंड उघडून त्यांना शिकवू लागला:

"जे आत्म्याने दीन ते धन्य, कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे." "जे शोक करीत आहेत ते धन्य, कारण त्यांचे सांत्वन करण्यात येईल." "जे सौम्य ते धन्य, कारण ते पृथ्वीचे वतन भोगतील." "जे नीतिमत्वाचे भुकेले आणि तान्हेले ते धन्य, कारण ते तृप्त होतील."

"जे दयाळू ते धन्य, कारण त्यांच्यावर दया होईल." "जे अंत:करणाचे शुध्द ते धन्य, कारण ते देवाला पाहतील." "जे शांती करणारे ते धन्य, कारण त्यांना देवाची मुले म्हणतील."

''नीतिमत्त्वाकरिता ज्यांचा छळ झाला आहे ते धन्य, कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे.''

''माझ्यामुळे जेव्हा लोक तुमची निंदा आणि छळ करतील आणि तुमच्याविरुध्द सर्व प्रकारचे वाईट लबाडीने बोलतील तेव्हा तुम्ही धन्य! आनंद करा, उल्हास करा, कारण स्वर्गात तुमचे प्रतिफळ मोठे आहे.''

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रास्ताविक**

माझ्या बंधुभगिनींनो, या सामुदायिक प्रार्थनेद्वारे फक्त आपणासाठी आणि आपल्या गरजांसाठीच नव्हे तर अखिल मानवजातीसाठी आपण आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताकडे प्रार्थना करू या.

**प्रतिसाद :** हे प्रभो, आम्हांला आरोग्यदान दे.

१. पोप, कार्डिनल्स, बिशप्स, फादर्स व सिस्टर्स ह्यांना परमेश्वराच्या दैवी शक्तीने येशूची सुवार्ता घोषविण्यास चांगले आरोग्य व मानसिक स्वास्थ्य मिळावे म्हणून परमेश्वराकडे प्रार्थना करू या.

२. आपल्या कुटुंबामध्ये परमेश्वराची शांती, प्रेम, ऐक्य व सौख्य ह्याचा अनुभव आपल्या प्रत्येकांना यावा व सर्व संकटांपासून परमेश्वराने आपले रक्षण करावे म्हणून प्रार्थना करू या.

३. आपल्या देशामध्ये व समाजात कोणावर अन्याय होत आहेत, अशा गरीब दुर्बल व्यक्तींना योग्य तो न्याय मिळावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. जे तरुण व तरुणी बेकार आहेत अशांना परमेश्वराने धीर व दिलासा देऊन त्यांना सुमार्ग दाखवावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आता थोडावेळ शांत राहून वैयक्तिक हेतुंसाठी प्रार्थना करू या.

## समारोप

हे स्वर्गीय पित्या, विश्वासाने आणि प्रेमाने आम्ही तुझ्याकडे येतो. तुझ्या चांगुलपणाचा महिमा गातो आणि आमच्या गरजा आम्ही तुझ्यापुढे मांडतो. आमच्या प्रार्थना ऐक. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, तुझ्या वेदीजवळ आणलेल्या आमच्या ह्या दानांचा प्रसन्नतेने स्वीकार कर व त्यांना आमच्या मुक्तीचा संस्कार बनव. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे प्रभो, तारणप्राप्तीसाठी तू आम्हांला शक्ती देतोस. या ख्रिस्तप्रसादामुळे आम्हांला खरी श्रध्दा दे व जगभर या श्रध्देची वाढ कर. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## चिंतन

लादलेले दारिद्र्य आणि हेतुपुरस्सर घेतलेले दरिद्र्याचे व्रत यामध्ये एक मूलभूत फरक असा आहे की माणूस लादलेल्या दारिद्र्याबद्दल कुरकूर करीत त्याच्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करतो. प्रसंगी तो क्रांतीची ज्योत हाती घेऊन बंड, आंदोलन, हिंसाचार या मार्गाने जाऊ शकतो. याउलट अंगिकारलेले दारिद्र्य उदात्त हेतूसाठी असल्याने माणूस गरीब राहणे पसंत करतो, त्यात समाधान मानतो. त्याच्या गरजा मर्यादित असतात, त्याच्या मुखात कुरकूर नसून कृतज्ञतेची भावना असते. अशा व्यक्ती पैशावर नव्हे तर परमेश्वरावर विसंबून असतात. अशा व्यक्तींठायी दिसून येणाऱ्या सद्गुणांपैकी आजच्या वाचनात तीन सद्गुण नमूद करण्यात आलेले आहेत.

**१) नम्रता :** 'महापुरे झाडे जाती तेथे लव्हाळे वाचती' ह्या उक्तीनुसार परमेश्वराच्या क्रोधाच्या दिवशी अहंकारी व घमेंडी लोक जमीनदोस्त होतील तर नम्रजन वाचतील असे पहिले वाचन आपल्याला सुचविते. इस्राएलवर जेव्हा असिरियाचा व त्यानंतर बाबिलोनचा हल्ला होईल त्यावेळी परमेश्वर नम्र व गरीब लोकांचे संरक्षण करील असा भाकितवजा इशारा संदेष्टा सफन्या देतो.

**२) साधेपणा :** करिंथ येथील लोक स्वाभिमानी वृत्तीचे होते. आपल्या ज्ञानाबद्दल त्यांना गर्वाची बाधा झालेली होती. आपल्या ज्ञानाच्या बळावर आपण स्वर्गीय संपत्ती प्राप्त करू शकतो असा फाजील आत्मविश्वास ते आपणाठायी बाळगून होते. संत पौल त्यांना आव्हान देत केवळ ख्रिस्ताच्या क्रूसाचा अभिमान बाळगण्याचा म्हणजेच देवाच्या आज्ञांचे पालन करून साधेपणाचे जीवन जगण्याचा सल्ला देतो.

**३) आंतरिक जीवन :** संत मत्तयच्या शुभवर्तमानातील आठही धन्योद्गार आपल्याला आंतरिक जीवन जगण्यास पाचारण करतात. त्यामध्ये आत्म्याने दीन असणे, पापांबद्दल शोक करणे, मनाने सौम्य असणे, नीतिमत्त्वासाठी भुकेलेले असणे, दयाळू असणे, अंत:करणाचे शुध्द असणे, शांतीसाठी झटणे आणि चांगल्या गोष्टींसाठी छळ सहन करणे ह्या आठ गुणांचा समावेश होतो. ह्या सद्गुणांचा अभाव असताना वरवर दारिद्र्याचे व्रत धारण करणे हे परस्परविरोधी असते.

**आत्मपरीक्षण :** दारिद्र्य, गरीब लोक आणि गरिबीचे व्रत घेऊन जीवन जगणारे व्रतस्थ ह्यांच्या जीवनाकडे पाहून मला कोणती प्रेरणा मिळते. आंतरिक जीवन फुलवत ठेवून नम्रता व साधेपणा अंगिकारण्यासाठी मला काय काय करता येईल?

●●●

| जानेवारी/फेब्रुवारी २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | चौथा सप्ताह |
|---|---|---|
| सोम ३० | मारिस्कोटीच्या हायसिंथा (हि) | : इब्री. ११:३२-४०/मार्क ५:१-२० |
| मंगळ ३१ | सं जॉन बास्को (पां) | : इब्री.१२:१-४/मार्क ५:२१-४६ |
| बुध ०१ | सं हिलरी मोर्स (हि) | : इब्री.१२:४-१५/मार्क ६:१-६ |
| गुरू ०२ | येशूचे देवालयात समर्पण | : मलाखी ३:१-४/स्तोत्र २४/इब्री.२:१४-१८/लूक २:२२-४० |
| शुक्र ०३ | सं ब्लेस (हि) | : इब्री.१३:१-८/मार्क ६:१४-२९ |
| शनि ०४ | सं जॉन दिब्रिटो (तां) | : इब्री.१३:१५-२१/मार्क ३:२४-३० |